# वाक्प्रचार

**STB : X** **MARATHI**

१. **हात दाखवून अवलक्षण** - स्वत:हून स्वत:वर संकट ओढवून घेणे
**वाक्य :** मध्येच गैर बोलून उमेशने हात दाखवून अवलक्षण केले.

२. **सुरुंग लावणे** - एखादे कारस्थान मोडणे.
**वाक्य :** महादूने शंका उपस्थित करून सरपंचांनी आखलेल्या चांगल्या योजनेला सुरूंग लावला.

३. **अंगाचा तिळपापड होणे** - अतिशय राग येणे.
**वाक्य :** निलेशने अंगणातली रांगोळी पुसल्यामुळे अरूणाच्या अंगाचा तिळपापड झाला.

४. **अध:पतन होणे** - दर्जा घसरणे.
**वाक्य :** माणसाला गर्व झाला की त्याचे अध:पतन होते.

५. **अधीर होणे** - धीर न होणे.
**वाक्य :** परीक्षेचा निकाल ऐकण्यासाठी सुधीर अगदी अधीर झाला होता.

६. **अंगावर काटा उभा राहणे** - भीतीने शहारा येणे.
**वाक्य :** पुरामध्ये गावाची झालेली दुर्दशा पाहून सरपंचाच्या अंगावर काटा उभा राहिला.

७. **आ वासून पाहणे** - आश्चर्याने पाहणे.
**वाक्य :** भर उन्हात पडणारा पाऊस मिताली आ वासून पाहत राहिली.

८. **उसंत न मिळणे** - रिकाम वेळ न मिळणे.
**वाक्य :** संध्याकाळी नदी किनारी जाण्यास आज मला उसंत लाभली नाही.

९. **आकाशातून आग ओकू लागणे** - सूयाचे भयंकर कडक ऊन पडणे
**वाक्य :** मे महिन्यातील एका दुपारी सूर्य आकाशातून आग ओकू लागला होता.

१०. **आर्जव करणे** - कळकळून विनंती करणे
**वाक्य :** पहाटे अभ्यासाला लवकर उठव म्हणून राहुलने ताईकडे आर्जव केले.

११. **नकारार्थी मान हलवणे** - नाही म्हणणे
**वाक्य :** ट्रकिंगला जायचे म्हणताच सोनूने नकारार्थी मान हलवली.

१२. **बेतात असणे** - तयारीत असणे
**वाक्य :** काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो.

१३. **एका पायावर 'हो' म्हणणे** - पूर्णपणे तयारी दर्शवणे.
**वाक्य :** सिनेमाला जायचे म्हटल्यावर मुलांनी एका पायावर 'हो' म्हटले.

©9664080155

१४. **आदर दुणावणे** - आदर दुप्पट होणे
**वाक्य :** रामभाऊंनी गावच्या पाणी टंचाईचा प्रश्न सोडवल्यामुळे गावकऱ्यांचा त्यांच्याविषयीचा आदर दुणावला.

१५. **कलम होणे** - छाटले जाणे
**वाक्य :** जुन्या काळात गुन्हेगारांना शिक्षा म्हणून त्यांची मान कलम केली जात असे.

१६. **अवहेलना करणे** - अपमान करणे
**वाक्य :** कामचुकार महादूची त्याच्या मालकांनी अवहेलना केली.

१७. **सूड घेणे** - बदला घेणे
**वाक्य :** द्वेषातून एकमेकांचा सूड घेणे ही भावना अत्यंत घातक आहे.

१८. **आदेश देणे** - हुकूम करणे
**वाक्य :** येत्या वर्षात बरीचशी गावे तंटामुक्त झाली पाहिजेत असा मुख्यमंत्र्यांनी सर्व आमदारांना आदेश दिला.

१९. **आनंद गगनात न मावणे** - अतिशय आनंद होणे
**वाक्य :** परीक्षेत ९९% गुण मिळाल्यामुळे मितालीचा आनंद गगनात मावेना.

२०. **आयुष्याचे मोल देणे** - जीवन समर्पित करणे
**वाक्य :** भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिवीरांनी आपल्या आयुष्याचे मोल दिले.

२१. **आश्चर्याने थक्क होणे** - चकित होणे
**वाक्य :** माथेरानचा अजब निसर्ग देखावा पाहून पर्यटक आश्चर्याने थक्क झाले.

२२. **आश्वासन देणे** - शब्दांनी धीर देणे
**वाक्य :** या वर्षी गावात वीज येईल, असे वीज मंडळाने आश्वासन दिले.

२३. **आस्था वाटणे** - प्रेम वाटू लागणे
**वाक्य :** नवीन शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीमुळे मला अभ्यासाबद्दल आस्था वाटू लागली.

२४. **आंतरिक ओढ वाटणे** - मनापासून इच्छा उत्पन्न होणे
**वाक्य :** निरोगी समाज होण्यासाठी स्वच्छता अभियानाविषयी मला आंतरिक ओढ वाटू लागली.

२५. **उत्कंठा वाढणे** - कुतूहल वाढणे
**वाक्य :** नवनवीन वेबसाइट व ॲप्सबद्दल राजूची उत्कंठा वाढू लागली.

२६. **उत्तेजन मिळणे** - प्रोत्साहन मिळणे
**वाक्य :** अभ्यासाबाबत मला माझ्या सर्व शिक्षकांकडून उत्तेजन मिळते.

२७. **उत्साहाचे वारे भरणे** - अतिशय उत्साह वाटणे
**वाक्य :** आयपीएलचा अंतिम सामना बघायला मिळणार म्हणून शिरीषच्या अंगात उत्साहाचे वारे भरले.

२८. **उत्साहाला उधाण येणे** - मनात उत्साह वाटणे
**वाक्य :** फुटबॉल फायनलमध्ये प्रवेश केल्यामुळे आमच्या संघाच्या उत्साहाला उधाण आले.

२९. **ऊर अभिमानाने भरून येणे** - मनापासून खूप अभिमान वाटणे
**वाक्य :** आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत रोहितला प्रथम पारितोषिक मिळाले, हे ऐकून त्याच्या आईचा ऊर अभिमानाने भरून आला.

Sai Sir ©9664080155

३०. **कडाक्याच्या थंडीने कुडकुडणे -** कडक गारठ्याने अंग थरथरणे.
**वाक्य :** बर्फ पडू लागताच वैष्णोदेवीला गेलेले यात्रेकरू कडाक्याच्या थंडीने कुडकुडले.

३१. **कबुली देणे** - मान्य करणे
**वाक्य :** चोप दिल्यानंतर चोरांनी चोरी केल्याची पोलिसांना कबुली दिली.

३२. **कवेत घेणे** - मिठीत घेणे
**वाक्य :** बऱ्याच वर्षांनी माहेरी आलेल्या सुलभाला आईने प्रेमाने कवेत घेतले.

३३. **कानावर येणे** - ऐकिवात येणे
**वाक्य :** शामूच्या लबाडीची वार्ता मालकांच्या कानावर आली होती.

३४. **काळजाला भिडणे** - खूप आवडणे
**वाक्य :** जाहिरातींमध्ये अमिताथ बच्चन यांनी केलेला अभिनय लोकांच्या काळजाला भिडतो.

३५. **कीव येणे** - दया येणे
**वाक्य :** फुटपाथवर बसलेल्या त्या गरीब भिकाऱ्याची सीताबाईंना खूप कीव आली.

३६. **खबरदारी घेणे** - काळजी घेणे
**वाक्य :** प्रवासात प्रत्येकाने आपापल्या वस्तूंची नीट खबरदारी घ्यायला हवी.

३७. **गडबडून जाणे** - धांदल उडणे
**वाक्य :** अचानक आलेल्या पावसाने रस्तावरील माणसे गडबडून गेली.

३८. **गोडी लावणे** - (एखाद्या विषयाची) आवड लावणे
**वाक्य :** व्यवस्थित मार्गदर्शन करून गणितासारख्या कठिण विषयात मला सरांनी गोडी लावली.

३९. **घसा कोरडा पडणे** - भिती वाटणे
**वाक्य :** समोर भल्या मोठ्या अजगराला पाहून रमेशचा घसा कोरडा पडला.

४०. **चक्कर मारणे** - फेरफटका मारणे
**वाक्य :** संध्याकाळी थंड हवेत थोडी चक्कर मारली, तर अंगात उत्साह संचारतो.

४१. **पुष्टी देणे** - आपले मत व्यक्त करणे
**वाक्य :** वडिलांच्या सगळ्या कामांमध्ये व विचारांमध्ये आई नेहमी पुष्टी देते.

४२. **प्रस्ताव समोर येणे** - योजनाबद्ध मांडणी करणे
**वाक्य :** एके दिवशी अचानक वर्गात शैक्षणिक सहलीचा प्रस्ताव समोर आला.

४३. **हातभार लावणे** - मदत करणे
**वाक्य :** आपण सर्वांनी पर्यावरण संवर्धनास हातभार लावला पाहिजे.

४४. **चेहरा पडणे** - उदास वाटणे, लाज वाटणे
**वाक्य :** स्वच्छता ॲपवर उमटलेली काळीकुट्ट पावले पाहून पावडे काकांचा चेहरा पडला.

४५. **बळी पडणे** - मान्य करणे
**वाक्य :** शीलाच्या गोड गोड बोलण्याला सुमन नेहमी बळी पडते.

४६. **धीर न सोडणे** - हिंमत न हरणे
**वाक्य :** संकटात कधीही आपला धीर सोडू नये.

४७. **न खचणे** - कठीण परीस्थितीत कोलमडून न जाणे
**वाक्य :** संकटात कधीही मनाने खचू नये.

४८. **नाव उज्ज्वल करणे** - नावारूपाला येणे
**वाक्य :** परीक्षेत फार मोठे यश संपादन करून शिवानीने आईवडिलांचे नाव उज्ज्वल केले.

४९. **निरोप घेणे** - सांगून निघून जाणे
**वाक्य :** चहापान आटोपल्यावर स्नेहसंमेलनात आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी मुख्याध्यापकांचा निरोप घेतला

५०. **पर्वणी असणे** - आनंदमय काळ मिळणे
**वाक्य :** भिलारी गावात पुस्तकांची जत्रा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी पर्वणी असते.

५१. **पंचनामा करणे** - लेखी चौकशी अहवाल तयार करणे
**वाक्य :** अपघात झालेल्या स्थळी पोलिसांनी ताबडतोब अपघाताचा पंचनामा केला.

५२. **हातची संधी गमावणे** - हातचा मोका घालवणे
**वाक्य :** ढगाळ वातावरणामुळे चंद्रग्रहण बघण्याची हातची संधी गेली.

५३. **पाठलाग करणे** - पिच्छा करणे
**वाक्य :** चोरी करून चोर पळून जात असताना पोलिसांनी त्याचा पाठलाग केला.

५४. **पारंगत असणे** - तरबेज असणे
**वाक्य :** चिन्मयी एवढ्या लहानग्या वयात चित्रकलेत पारंगत झाली.

५५. **पार करणे** - अंतर कापणे
**वाक्य :** निबीड जंगलाचा रस्ता प्रवाशांनी अखेर पार केला.

५६. **उधाण येणे** - उत्साह संचारणे
**वाक्य :** आवडते शिक्षक वर्गात आल्याने विद्यार्थ्यांना उधाण आले.

५७. **आश्चर्याने थक्क होणे** - नवल वाटणे
**वाक्य :** लहान बाळाला पोहताना पाहून मी आश्चर्याने थक्क झाले.

५८. **पाया पक्का होणे** - मूळ ज्ञान भक्कम होणे
**वाक्य :** कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचा पाया घातला.

५९. **पाय न वाजवता जाणे** - अगदी हळू चालणे
**वाक्य :** आईने मंदिरात पाय न वाजवता प्रवेश केला.

६०. **पाय धरणे** - शरण येणे
**वाक्य :** रामभाऊंनी घरात आलेल्या गुरूमाऊलींचे पाय धरले.

६१. **चौकस राहणे** - चहूकडे सावधपणा ठेवणे
**वाक्य :** आपल्या व्यवहाराबद्दल प्रत्येकाने चौकस राहणे क्रमप्राप्त आहे.

६२. **छाती आनंदाने फुगवणे** - अभिमानाने खूप आनंद होणे
**वाक्य :** बुद्धिबळ स्पर्धेत अजिंक्य ठरल्यावर सोहमची छाती आनंदाने फुगली.

@9664080155

६ ३ . **जिभेवर ताबा नसणे** - वाटेल ते खाणे
**वाक्य :** रागाचा पारा वर चढला की जनाबाईंच्या जिभेवर ताबा राहत नाही.

६ ४ . **जिवावर येणे** - त्रास होणे
**वाक्य :** ऐन हिवाळ्यात पहाटे उठणे सुधाला अगदी जिवावर येते.

६ ५ . **जीव ओवाळणे** - जीवन कुर्बान करण
**वाक्य :** स्वातंत्र्य संग्रामात अनेक क्रांतिवीरांनी मातृभूमीवर आपला जीव ओवाळून टाकला.

६ ६ . **टाळ्यांचा कडकडाट होणे** - सतत टाळ्या वाजवून कौतुक करणे
**वाक्य :** आमचा कबड्डी संघ अंतिम विजेता घोषित होताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

६ ७ . **डोळ्यांत पाणी उभे राहणे** - डोळ्यांत अश्रू येणे
**वाक्य :** लेकीला सासरी पाठवताना लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले.

६ ८ . **टक लावून पाहणे** - एक सारखे बघणे
**वाक्य :** माथेरानचा तो संदर देखावा माधुरी अगदी टक लावून पाहत होती.

६ ९ . **भुरळ पडणे** - आवड निर्माण होणे
**वाक्य :** माधुरीच्या नृत्याच्या अदांनी मला भुरळ पाडली.

७ ० . **डोळे पाणावणे** - डोळे ओलावणे
**वाक्य :** भूतकाळात केलेल्या अपार कष्टाची आठवण होताच आईचे डोळे पाणावले.

७ १ . **डोळे लावून बसणे** - सतत वाट पाहणे
**वाक्य :** कामावरून उशिरा येणाऱ्या शीतलकडे आई डोळे लावून बसते.

७ २ . **डोळे भरून पाहणे** - प्रेमाने अनुभवणे
**वाक्य :** नुकत्याच जन्मलेल्या बाळाला त्याच्या आजीने डोळे भरून पाहिले.

७ ३ . **खूणगाठ मनाशी बांधणे** - पक्का निश्चय करणे
**वाक्य :** मी पोलिस अधिकारी होण्याची मनाशी खूणगाठ बांधली.

७ ४ . **तथ्य वाटणे** - मुद्दा विचाराधीन होणे, सत्य वाटणे.
**वाक्य :** वकिलाने कोर्टात केलेल्या युक्तिवादात न्यायाधीश महाराजांना तथ्य वाटले.

७ ५ . **ताकास तूर न लागू देणे** - थांग लागू न देणे
**वाक्य :** वर्षभर शाल्मलीने आपण गाणे शिकतोय याचा ताकास तूर लागू दिला नाही.

७ ६ . **दडपण येणे** - मनावर दबाव येणे
**वाक्य :** परीक्षा जवळ येताच महेशच्या मनावर दडपण आले

७ ७ . **दक्ष असणे** - सावध असणे
**वाक्य :** भारतीय सीमेचे रक्षण करण्यासाठी आपले जवान नेहमी दक्ष असतात.

७ ८ . **जीवाला मुकणे** - मृत्यू पावणे
**वाक्य :** दंगलीत निरपराध माणसे जीवाला मुकली.

७ ९ . **हुरळून जाणे** - आनंदी होणे
**वाक्य :** संध्याकाळी जत्रेला जाण्यासाठी मुले हुरळून गेली होती.

©9664080155

८०. **दिशा दाखवणे** - योग्य मार्ग दाखवणे
**वाक्य** : भरकटलेल्या मोहितला त्याच्या काकांनी योग्य दिशा दाखवली.

८१. **देणे - घेणे नसणे** - संबंध नसणे
**वाक्य** : आपल्या आजूबाजूला काय घडत आहे, याचे काही लोकांना देणे - घेणे नसते.

८२. **धडगत नसणे** - इलाज नसणे
**वाक्य** : संकटांना सामोरे जाण्याशिवाय आपली धडगत नसते

८३. **धडा शिकणे** - शिकवण मिळणे
**वाक्य** : आळसाने कार्य नासते, हा श्याम धडा शिकला.

८४. **धारण करणे** - अंगिकारणे
**वाक्य** : आपल्या स्वभावात नेहमी नम्रता धारण करावी.

८५. **धाव घेणे** - जोरात पळणे
**वाक्य** : वाघाची चाहूल लागताच जंगलातील हरणांनी सुसाट धाव घेतली.

८६. **बोट धरून चालवणे** - आधार देऊन मार्ग दाखवणे
**वाक्य** : प्रत्येक गोष्टीत मला माझ्या दादाने बोट धरून चालवले.

८७. **बोट रोखणे** - विशिष्ट दिशेला लक्ष वेधणे
**वाक्य** : वर्गात कचरा कुणी केला असे सरांनी विचारताच सर्वांनी सर्वेशकडे बोट रोखले.

८८. **भरल्या ताटावरून उठणे** - न जेवता उठणे
**वाक्य** : बाबा दादावर रागावले तेव्हा दादा भरल्या ताटावरून उठला.

८९. **भास होणे** - चाहूल लागणे
**वाक्य** : कुणीतरी आपल्यावर नजर ठेवून आहे, असा महेशला नेहमी भास होतो.

९०. **भीक न घालणे** - पर्वा न करणे
**वाक्य** : आपल्या पाठीमागे आपली कोणी कुचेष्टा केली तर अजिबात भीक घालू नये.

९१. **भिकेला लागणे** - दारिद्र्य वाट्याला येणे
**वाक्य** : जुगारात सारी संपत्ती घालवल्यामुळे सदू आता भिकेला लागला.

९२. **भुरळ पडणे** - मोह होणे
**वाक्य** : पावसातल्या त्या सुंदर दृश्याची अमिराला भुरळ पडली.

९३. **मन घट्ट करणे** - मन आवरणे.
**वाक्य** : दु:खाचे डोंगर कोसळल्यानंतरही माझ्या मामाने आपले मन घट्ट केले.

९४. **मनावर कोरले जाणे** - मनावर कायम ठसा उमटणे
**वाक्य** : गुरूजींनी सांगितलेले सुवचन माझ्या मनावर कोरले गेले.

९५. **मागे-पुढे न बघणे** - विचार न करता तत्परतेने कृती करणे
**वाक्य** : पक्षाचा आदेश येताच मागे - पुढे न बघता कार्यकर्ते कामाला लागले.

९६. **मान खाली घालणे** - दोष कळल्यावर नम्र होणे
**वाक्य** : सरांनी मोहनने केलेली चूक त्याच्या लक्षात आणून देताच मोहनने मान खाली घातली.

Sai Sir ©9664080155

९७. **मान वर होणे** - अभिमानाने मन भरून येणे
**वाक्य :** परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला तेव्हा सर्व विद्यार्थ्यांची मान वर झाली.

९८. **मूठभर मांस चढणे** - स्तुतीने हुरळून जाणे
**वाक्य :** सगळ्यांची शाबासकी मिळाली, तेव्हा माधवच्या अंगावर मूठभर मांस चढले.

९९. **मोर्चा वळवणे** - विशिष्ट काम करण्यासाठी जाणे
**वाक्य :** सगळ्या गावकऱ्यांनी आधी योजना समजून घेतली व नंतर विहीर बांधणीसाठी मोर्चा वळवला.

१००. **रममाण होणे** - गुंगून जाणे
**वाक्य :** चित्रकलेच्या छंदात अमर नेहमी रममाण होतो.

१०१. **राखीव कुरण असणे** - एखाद्या विषयात गती असणे
**वाक्य :** संगणकाचे कोणतेही काम हे रोहितचे अगदी राखीव कुरण आहे.

१०२. **रात्र उतरणीला लागणे** - रात्र संपत येणे
**वाक्य :** अभ्यास करता करता रात्र कधी उतरणीला लागली ते उषाला कळलेच नाही.

१०३. **राबता असणे** - सतत ये-जा असणे
**वाक्य :** महानगरपालिकेच्या कार्यालयात जनसामान्यांचा नेहमी राबता असतो.

१०४. **वर्ज्य असणे** - गाळून टाकणे
**वाक्य :** अभ्यासातील कोणताही विषय वर्ज्य करणे चुकीचे आहे.

१०५. **वरमणे** - भावना आवरणे
**वाक्य :** ताईने थोडासा दम देताच राजन लगेच वरमला.

१०६. **वाया जाणे** - फुकट जाणे
**वाक्य :** अकाली पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचे सारे कष्ट वाया गेले.

१०७. **वाव नसणे** - संधी नसणे
**वाक्य :** क्रिकेटच्या अंतिम सामन्यात कोणत्याही संघाला चुका करण्यास वाव नव्हता.

१०८. **वेड्यात काढणे** - बावळट समजणे
**वाक्य :** भर उन्हात कोट घालून फिरणाऱ्या सुरेशला सगळ्यांनी वेड्यात काढले.

१०९. **व्याप्ती वाढणे** - विस्तार वाढणे
**वाक्य :** काही वर्षांनंतर सदाशिवरावांनी आपल्या कार्यालयाची व्याप्ती वाढवली.

११०. **शरमिंदे वाटणे** - लाज वाटणे
**वाक्य :** आपण आईशी खोटे बोललो हे केशवला मनोमन उमजताच त्याला शरमिंदे वाटले.

१११. **शाबासकीची थाप देणे** - खूप कौतुक करणे
**वाक्य :** पहिला नंबर मिळाल्यावर मॅडमनी सोनालीच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

Sai Sir ©9664080155

१ १ २ . **शाश्वती नसणे** - भरवसा नसणे
**वाक्य :** कोणत्या वेळी काय घडेल, याची कोणतीही शाश्वती नसते

१ १ ३ . **श्रद्धा ठेवणे** - मनापासून विश्वास नसते
**वाक्य :** मनापासून केलेल्या आपल्या कार्यावर आपली श्रद्धा ठेवावी.

१ १ ४ . **श्रेय घेणे** - दुसऱ्याचा नावलौकिक हडपणे
**वाक्य :** दुसऱ्याच्या यशाचे आपण श्रेय घेणे हे अत्यंत चुकीचे आहे.

१ १ ५ . **सक्त ताकीद देणे** - कडक समज देणे
**वाक्य :** इथून पुढे उशिरा शाळेत न येण्याबद्दल सरांनी राघवला सक्त ताकीद दिली.

१ १ ६ . **सल्ला देणे** - उपदेश करणे
**वाक्य :** सरांनी उमेशला नियमित अभ्यास करण्याचा मोलाचा सल्ला दिला.

१ १ ७ . **संकोच वाटणे** - भीड वाटणे
**वाक्य :** आपली चूक कबूल करताना आपल्याला संकोच वाटतो.

१ १ ८ . **संस्कार करणे** - चांगले विचार रूजवणे
**वाक्य :** उदेशच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी त्याच्या आईने त्याच्यावर चांगले संस्कार केले.

१ १ ९ . **सामना करणे** - मुकाबला करणे
**वाक्य :** माणसाने जिद्दीने आलेल्या संकटांचा झटून सामना करावा.

१ २ ० . **स्वत :ला झोकून देणे** - (कार्यात) समरस होणे
**वाक्य :** स्वातंत्र्यसंग्रामामध्ये क्रांतिवीरांनी स्वत :ला झोकून दिले.

१ २ १ . **स्वत :शी पुटपुटणे** - तोंडातल्या तोंडात बोलणे
**वाक्य :** वर्गात प्रश्न विचारल्यावर उत्तर माहीत नसल्याने साहिल स्वत :शीच पुटपुटू लागला.

१ २ २ . **स्वप्न साकार करणे** - भविष्यातील स्वप्न पूर्ण करणे
**वाक्य :** मितालीने परीक्षेत उज्ज्वल यश मिळवण्याचे स्वप्न साकार केले.

१ २ ३ . **स्वरसाज चढवणे** - गाण्याला चाल लावणे
**वाक्य :** संगीतकार कौशल इनामदार यांनी प्रा. अशोक बागवे यांच्या गीताला स्वरसाज चढवला.

१ २ ४ . **हळवा होणे** - मन मृदू कोमल होणे
**वाक्य :** आपल्या गरीब परिस्थितीचे वर्णन करताना सदू एकदम हळवा झाला.

१ २ ५ . **हळहळणे** - चिंता होणे
**वाक्य :** धावण्याच्या स्पर्धेत काही सेकंदांनी आपला नंबर हुकल्यामुळे शरद खूप हळहळला.

१ २ ६ . **हकालपट्टी करणे** - बाहेर काढणे
**वाक्य :** वर्गात गोंधळ घातल्यामुळे सरांनी चार मुलांची हकालपट्टी केली.

१२७. **हात जोडणे** - विनवणी करणे
**वाक्य :** देवासमोर विनम्रपणे हात जोडणे हे चांगले लक्षण आहे.

१२८. **हातभार लावणे** - मदत करणे
**वाक्य :** प्रत्येक चांगल्या कार्यात सर्वांचाच हातभार लागतो.

१२९. **हातात हात घालणे** - एकत्र सहकार्याने कार्य करणे
**वाक्य :** हातात हात घालून गावकऱ्यांनी विहिरीची साफसफाई केली.

१३०. **हादडणे** - जेवणावर ताव मारणे
**वाक्य :** बेबीच्या लग्नात पाहुण्यांनी मस्त पाहुणचार हादडला.

१३१. **हुरळून जाणे** - खूप आनंद होणे
**वाक्य :** सहलीला जायला मिळणार म्हणून आनंद खूप हुरळून गेला.

१३२. **हृदयाशी धरणे** - मायेने कुशीत घेणे
वाक्य : आई आपल्या बाळाला मायेने हृदयाशी धरते.

१३३. **हेवा वाटणे** - मत्सर वाटणे
**वाक्य :** गुणाजी इतके सुंदर चित्र काढतो म्हणून महेशला त्याचा हेवा वाटतो.

१३४. **क्षमा करणे** - माफ करणे
**वाक्य :** सर्वांना क्षमा करणे हे संताचे ब्रीद होते.

◈◈◈